
भलं मोठ्ठं धिरडं




भलं मोठ्ठं धिरडं



मूळ कथा सांगितली आहे वेरा साऊथगेट यांनी.
चित्रे गिलियन हरी

खूप पूर्वी एकदा एका घरात एक आई आणि तिचे सात छोटे मुलगे राहत होते. त्या सात जणांना सारखी भूक लागलेलीच असायची.









एक दिवस आईने ठरवले की आपल्या सात भुकेल्या मुलांसाठी एक भलंमोठ्ठं धिरडं बनवायचं॰

तिने पीठ, मीठ, अंडी आणि तूप घेतलं आणि छान मिसळून त्याचं सैलसर मिश्रण तयार केलं.


मग तिने तिच्याकडे असलेल्या सर्वात मोठया तव्यावर तूप गरम केलं.



आणि मग आईने ते सैलसर भिजवलेलं मिश्रण त्या मोठठ्या तव्यावर ओतलं॰ त्याचं एक भलंमोठ्ठं धिरडं तयार झालं. त्या सात सदा भुकेल्या मुलांना पुरेल एवढं मोठ्ठं धिरडं




धिरडं तयार होत असताना ते सात लहान मुलगे धिरड्याकडे लक्ष देऊन बघत बसले होते. ते म्हणाले, “आम्हाला भूक लागलीय. झालं का आता धिरडं तयार?”





त्यांच्या आईने धिरडं एका बाजूने उचलून खालून बघितलं. ती म्हणाली “आत्ता कुठे जरासं सोनेरी दिसायला लागलंय.”




“खाण्यासाठी तयार झालं का ते?” सातही छोट्या मुलांनी विचारलं.

“नाही रे “., त्यांची आई म्हणाली. “मला ते उलटावं लागेल आधी, म्हणजे त्याची दुसरी बाजू पण खरपूस दिसायला लागेल. मग तयार होईल ते॰”




धिरड्यानं आईचं हे बोलणं ऐकलं आणि विचार केला, “बाप रे दुसरी बाजू खरपूस होईपर्यंत मी थांबलो तर ही सात भुकेलेली मुलं मला खाऊन टाकतील आणि मी संपूनच (मरूनच) जाईन.”






“मी पळूनच जातो कसा,” असा विचार धिरड्यानं केला. “हो हो, मला ताबडतोब ह्या सात भुकेल्या लहान मुलांपासून दूर पळून जायला हवं.”



आईने दोन्ही हातात तवा झटकन असा उचलला की तव्यावरून धिरडं उंच उडालं आणि त्याने हवेतच कोलांटी घेतली.
मग ती ते हवेत उलटलेलं धिरडं तव्यावर घेणार तेवढ्यात काय झालं माहीतेय का



मग एक बाजू छान सोनेरी आणि दुसरी अर्धवट फिकट झालेली अशा स्थितीत ते जमिनीवरून एखाद्या नाण्यासारखं घरंगळायला लागलं.




"धिरडं स्वतःशीच म्हणालं, “ नाही नाही. तू पकडू शकणार नाहीस मला.” आणि हवेतच एक उडी मारून तव्याला चुकवून ते जमिनीवर पडलं॰

धिरडं घरंगळत घरंगळत दरवाज्यातून बाहेर गेलं आणि रस्त्यातून पळत सुटलं.

"थांब रे !". आई ओरडली. अजून तवा तिच्या हातातच होता.


"थांब रे !." धिरड्याच्या मागे धावत असताना आई ओरडली. धिरडं रस्त्यातून भरभर भरभर पळत सुटलं होतं.



ते सात छोटे सदा भुकेले मुलगे त्यांच्या आईच्या मागे रस्त्यावर धावू लागले॰

“थांब रे !.” ते सात छोटे सदा भुकेले मुलगे ओरडले . “आम्हाला खायचं आहे ना तुला.”


“नाही, नाही!.” धिरडं रस्त्यातून अजून भरभर पळता पळता म्हणत होतं. “मी नाही ह्या सात छोट्या सदा भुकेल्या मुलांना मला खाऊ देणार.”





“नाही, नाही!.” धिरडं म्हणालं. “मी नाही मला खाऊ देणार कोणाला. त्या मुलांची आई मला पकडू शकली नाही. ते सात छोटे सदा भुकेले मुलगे मला पकडू शकले नाहीत. आणि मी तुलाही मला पकडू देणार नाही.”



“थांब रे !.” तो माणूस ओरडला. “ अरे धिरड्या, तू किती स्वादिष्ट दिसतो आहेस रे. मी खाऊ का तुला ? खाऊ दे ना मला तुला.”








आणि ते धिरडं अजून भरभर घरंगळू लागलं.


आता तो माणूस त्या सात सदा भुकेल्या मुलांच्या आणि त्यांच्या आईच्या मागे जाऊ लागला. आणि ते सगळे मिळून त्या भल्या मोठठ्या धिरड्याच्या मागे पळत सुटले.


"थांब रे !." ते मांजर ओरडलं. "अरे धिरड्या, तू किती स्वादिष्ट दिसतो आहेस रे. मी खाऊ का तुला ? खाऊ दे ना मला तुला."






"नाही, नाही!." धिरडं म्हणालं. "मी नाही मला खाऊ देणार कोणाला. त्या मुलांची आई मला पकडू शकली नाही. ते सात छोटे सदा भुकेले मुलगे मला पकडू शकले नाहीत. तो माणूस मला पकडू शकला नाही. आणि मी तुलाही मला पकडू देणार नाही."






आणि ते धिरडं अजून भरभर घरंगळू लागलं.


आता ते मांजर तो माणूस, ते सात सदा भुकेले मुलगे, आणि त्या मुलांच्या आईच्या मागे जाऊ लागलं. आणि ते सगळे मिळून त्या भल्या मोठठ्या धिरड्याच्या मागे पळत सुटले.



"नाही, नाही!." धिरडं म्हणालं. "मी नाही मला खाऊ देणार कोणाला. त्या मुलांची आई मला पकडू शकली नाही. ते सात छोटे सदा भुकेले मुलगे मला पकडू शकले नाहीत. तो माणूस मला पकडू शकला नाही. ती मांजर मला पकडू शकली नाही आणि मी तुलाही मला पकडू देणार नाही."




"थांब रे !." ती कोंबडी ओरडली. "अरे धिरड्या, तू किती स्वादिष्ट दिसतो आहेस रे. मी खाऊ का तुला? खाऊ दे ना मला तुला."



आणि ते धिरडं अजून भरभर घरंगळू लागलं.


आता ती कोंबडी ते मांजर, तो माणूस, ते सात सदा भुकेले मुलगे, आणि त्या मुलांच्या आईच्या मागे जाऊ लागली. आणि ते सगळे मिळून त्या भल्या मोठ्या धिरड्याच्या मागे पळत सुटले..



लवकरच त्या धिरड्याच्या वाटेत एक बदक आलं.


"थांब रे !." ते बदक ओरडलं. "अरे धिरड्या, तू किती स्वादिष्ट दिसतो आहेस रे. मी खाऊ का तुला ? खाऊ दे ना मला तुला."


"नाही, नाही!." धिरडं म्हणालं. "मी नाही मला खाऊ देणार कोणाला. त्या मुलांची आई मला पकडू शकली नाही. ते सात छोटे सदा भुकेले मुलगे मला पकडू शकले नाहीत. तो माणूस मला पकडू शकला नाही. ती मांजर मला पकडू शकली नाही. ती कोंबडी मला पकडू शकली नाही आणि मी तुलाही मला पकडू देणार नाही."



आणि ते धिरडं अजून भरभर घरंगळू लागलं.

आता ते बदक ती कोंबडी, ते मांजर, तो माणूस, ते सात सदा भुकेले मुलगे , आणि त्या मुलांच्या आईच्या मागे जाऊ लागलं. आणि ते सगळे मिळून त्या भल्या मोठठ्या धिरड्याच्या मागे पळत सुटले.






लवकरच त्या धिरड्याच्या वाटेत एक गाय आली.

“थांब रे !.” ती गाय ओरडली. “अरे धिरड्या, तू किती स्वादिष्ट दिसतो आहेस रे. मी खाऊ का तुला ? खाऊ दे ना मला तुला.”

“नाही, नाही!.” धिरडं म्हणालं. “मी नाही मला खाऊ देणार कोणाला. त्या मुलांची आई मला पकडू शकली नाही. ते सात छोटे सदा भुकेले मुलगे मला पकडू शकले नाहीत. तो माणूस मला पकडू शकला नाही. ती मांजर मला पकडू शकली नाही. ती कोंबडी मला पकडू शकली नाही. ते बदक मला पकडू शकलं नाही आणि मी तुलाही मला पकडू देणार नाही.”





आणि ते धिरडं अजून भरभर घरंगळू लागलं.


आता ती गाय ते बदक, ती कोंबडी, ते मांजर, तो माणूस, ते सात सदा भुकेले मुलगे , आणि त्या मुलांच्या आईच्या मागे जाऊ लागलं. आणि ते सगळे मिळून त्या भल्या मोठ्या धिरड्याच्या मागे पळत सुटले.




लवकरच त्या धिरड्याच्या वाटेत एक डुक्कर आलं.

"एवढ्या घाईघाईने कुठे चालला आहेस तू?"

त्या डुक्कराने विचारलं॰







"मी एक आई, सात छोटे सदा भुकेले मुलगे, एक माणूस, एक मांजर, एक कोंबडी, एक बदक आणि एक गाय यांच्यापासून दूर पळतोय." त्या भल्या मोठठ्या धिरड्याने म्हटलं. "ते सगळे मला खायला उठलेत, पण मी नाही कोणाचा खाऊ बनून कोणाच्या तोंडी जाणार."


“अर्थात तू कोणालाही तुला खाऊ देणार नाहीस1” डुक्कर म्हणाले. डुक्कर धिरड्याच्या बाजूनेच पळत होते. “मी हे असं कधीच ऐकलं नाही.

लवकरच ते धिरडं आणि डुक्कर नदीपाशी आले.


“आता मी काय करू?” धिरड्याने डुक्कराला विचारलं. “मला तर पोहता येत नाही”








आता डुक्करानं आपले तोंड उघडलं आणि
धिरड मटकावलं.
आणि काय मस्त, स्वादिष्ट धिरडं होतं ते!



"पण मला पोहता येतं ना. " डुक्कर म्हणालं.
"तू माझ्या या नाकावर बस, आणि मी तुला
नदीच्या पलीकडे घेऊन जाईन."
ते ऐकून ते धिरडं घरंगळत डुक्कराच्या
नाकावर जाऊन बसलं.



अशा तऱ्हेने त्या धिरड्याचा अंत झाला. अशा रीतीने ती आई, ते सात छोटे सदा भुकेले मुलगे, एक माणूस, एक मांजर, एक कोंबडी, एक बदक आणि एक गाय यांना काही ते धिरडं मिळवता आलंच नाही

समाप्त

